
रौप्य महोत्सवी वर्ष
पद्मगंधा प्रतिष्ठान, नागपूर

# मराठीच्या



पद्मगंधा प्रतिष्ठान

# राज्यस्तरीय मराठी साहित्य संमेलन

नागपूर, दि. २९ व ३० डिसेंबर २०१८

*मी मराठी... माझी मराठी...*

## मराठी भाषा विशेष

# स्मरणिका



Govt. College of Arts & Science, Aurangabad.

पद्मगंधा प्रतिष्ठान
राज्यस्तरीय मराठी साहित्य संमेलन

# अनुक्रम


| | | |
|---|---|---|
| संपादकीय | शुभांगी भडभडे | ५ |
| मान्यवरांचे शुभ संदेश | | ९ |
| पद्मगंधा प्रतिष्ठान आयोजित नागपूर येथील राज्यस्तरीय साहित्य संमेलन | विष्णू मनोहर | १ |
| 'पद्मगंधा' च्या पाऊल खुणा | संगीता वाईकर (सचिव) | २ |
| सारस्वताचे लेणे | भारती सुदामे | २ |
| हे प्रतिभावान माणसा, तूच आहेस सर्वकाही... | डॉ. किशोर सानप | २ |
| अभिजात भाषा आणि साहित्य | डॉ. मदन कुलकर्णी | ३ |
| मराठी भाषेचे भवितव्य | डॉ. सौ. प्रज्ञा आपटे | ४ |
| अभिजात मराठी | प्रा. हरी नरके | ४ |
| मराठी भाषा, साहित्य आणि ज्ञानपीठ पुरस्कार | डॉ. राजेंद्र वाटाणे | ५ |
| मराठी काव्यातील बदलते प्रवाह | डॉ. उद्धव कानडे | ६ |
| साठोत्तरी मराठी समीक्षा | जनार्दन काटकर | ६ |
| मराठी कथाकालची आणि आजची | डॉ. छाया नाईक, नागपूर | ७ |
| साठोत्तरी नाटक | डॉ. विनोद इंदुरकर | ७ |
| साठोत्तरी कादंबरी | आरती देवगावकर | ८ |
| "लेखिका नाट्यमहोत्सव" | सौ. प्रतिभा कुळकर्णी | ८ |
| जाऊ पुस्तकांच्या गावा | वैशाली कार्लेकर | ८ |


संमेलन स्थळ : स्व. बाळशास्त्री हरदास साहित्य नगरी 'प्लॅटिनम सभागृह', अंधविद्यालय, बी.आर. मुंडले शाळा, दीक्षाभूमीरोड, नागपूर

२९ व ३० डिसेंबर २०१८



PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

Govt. College of Arts & Science Aurangabad

(124)

# साठोत्तरी मराठी समीक्षा

मराठवाडा प्रतिष्ठान
राज्यस्तरीय मराठी साहित्य संमेलन

आपल्या सांस्कृतिक जीवनाला १९६० नंतरच्या कालखंडात आणखी एक छेद गेला. या कालखंडात लघुनियतकालिकांची चळवळ,ग्रामीण साहित्य,दलित साहित्य, स्त्रीवादी साहित्य, आदिवासी साहित्य असे अनेक प्रवाह अधिक जोरकसपणे पुढे आले. १९४० ते १९६० या कालखंडावर बाळ सीताराम मर्ढेकर यांचा प्रभाव विशेषत्वाने पडलेला दिसून येतो. पुढे १९६० नंतरही तो प्रभाव कमी -अधिक प्रमाणात टिकून राहिला. वाङ्मीय महात्मता (१९४१), सौंदर्य आणि साहित्य (१९५५) हे मर्ढेकरांचे समीक्षाग्रंथ विशेष गाजले. त्यांनी मांडलेल्या लय सिद्धांताची खूप चर्चा झाली. कलेच्या संदर्भात अनेक प्रश्नांची मर्ढेकरांनी चर्चा केली. त्यानंतरची समीक्षा मर्ढेकरांच्या प्रश्नांचे खंडणमंडण करण्यात रमली. मर्ढेकरांच्या सौंदर्यविचारातील काही उणिवा नंतरच्या मे.पु.रेगे, प्रभाकर पाध्ये,रा.भा.पाटणकर यांसारख्या समीक्षकांनी दाखवून दिल्या.

१९६० पूर्वी समीक्षा लेखन करणारे अनेक समीक्षक १९६० नंतरही लेखन करीत होते. यातील महत्त्वाचे नाव म्हणजे दिनकर केशव बेडेकर हे होय. साहित्य निर्मिती आणि समीक्षा (१९५४) आणि साहित्यविचार (१९६४) या ग्रंथातून बेडेकरांनी साहित्यनिर्मितीच्या स्वरूपाची चर्चा केली आहे. कलावंताचे व्यक्तिमत्त्व व बाह्य वास्तव ह्यांच्या द्वंद्वात्मक प्रक्रियेतून कलाकृती कशी निर्माण होते.कलाकृतीची समीक्षा करीत असताना सामाजिक शास्त्रांचे साहाय्य कसे आवश्यक ठरते,सौंदर्यमूल्ये ही इतिहासनिष्ठ कशी असतात, ह्यांसारख्या बाबींचा परामर्श बेडेकरांनी घेतली आहे.

कुसुमावती देशपांडे कलेचा विचार व्यक्तिसमाज संबंधाद्वारे करतात. त्यांच्या मते सामान्याला व कलावंतांला जी सौंदर्यप्रतीती येते. ती त्यांच्या सांस्कृतिक संचितांनी रंगलेली असते. पण सामान्यांची प्रतीती समष्टींमध्ये रूळलेल्या कल्पनांनी मर्यादित असते. तर प्रतिभावंतांची सौंदर्यप्रतीती ही ठराविकाला आश्लेषून ज्ञानाच्या पलीकडे जाते. म्हणून मानवी अनुभवाचे क्षितिज विस्तारण्यासाठी या प्रतीतीचा उपयोग होतो. श्रेष्ठ कलेचे हे सामाजिक क्रांतिकार्य पासंग (१९६१) मधील अनेक लेखांतून त्यांनी मांडलेले आहे, त्यांच्या मते मराठी टीकेत विविधता, व्यासंगप्रियता आधिक्याने आली, पण टीका वाङ्मय समाजजीवनाजवळ आले नाही. कला आणि जीवन यांच्या संबंधावर दि.के. बेडेकर आणि कुसुमावती देशपांडे ह्यांनी चांगला प्रकाश टाकलेला आहे.

साठोत्तरी समीक्षेतील एक महत्त्वाचे नाव म्हणजे माधव आचवल होय. त्यांचे जास्वंद (१९७४), रसास्वाद (१९७२) इ. टीकालेखन याच काळातले. ही समीक्षा सौंदर्यतत्त्वाधिष्ठित आस्वादक समीक्षा आहे. कलावंताचे व्यक्तिमत्त्व, कलाकृतीच्या आविष्काराची समस्या त्या समस्येची सोडवणुकीची पद्धत यांवर ती भर देते. द.ग. गोडसे यांच्या पोत (१९६३), शक्तिसौष्ठव (१९७२) इ. ग्रंथातून आशयवादी समीक्षा साकार होते. त्यांच्या विवेचनामागे समूहसापेक्षता हे सूत्र आहे. ते जेव्हा आपल्या जीवनविषयक निष्ठांचे विश्लेषण करतात तेव्हा प्रवृत्त निसर्गाशी संवादी अशा निष्ठा आणि निवृत्त, कृत्रिम संकेतांशी जखडलेल्या निष्ठा असा मुख्य भेद करतात.

आशयवादी आणि रुपवादी अशा दोन्ही प्रकारच्या समीक्षेत सौंदर्यसंकल्पनेचा ऊहापोह कमीअधिक प्रमाणात झालेला आहेच, पण या सौंदर्यसंकल्पनेचे अधिक मूलगामी विवेचन प्रभाकर पाध्ये आणि रा.भा.पाटणकर यांनी केले आहे. प्रभाकर पाध्ये यांच्यामते कलाकृतीत ज्या अनुभवाची प्रतिमात्मक मांडणी असते, तो अनुभव कसदार असला पाहिजे. त्या अनुभवाने आपल्या मनातील चैतन्य शक्तीच्या मूलस्त्रोताला जाग आली पाहिजे. कलेचे हे अंतिम कार्य आहे. प्रभाकर पाध्ये यांच्या सौंदर्यविचार 'कलेची क्षितिजे' ह्या ग्रंथातून आणि श्आस्वादश (१९७७) मधील ग्रंथसमीक्षेतून अधिक स्पष्ट झालेली आहे. पाध्ये यांच्या सौंदर्यानुभव (१९७६) या ग्रंथात कलेचे अनुभवपूर्ण तत्त्व. कलात्मक अनुभव, कलेचे प्रयोजन, प्रतिभा, आस्वाद आणि समीक्षा अशा बाबींचा परामर्श त्यांनी सखोलपणे घेतलेला आहे.

PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad
Govt. College of Arts & Science ★ Aurangabad ★

कलाव्यवहार हा स्वायत्त आहे आणि कलाव्यवहार हा सर्वसामान्य जीवनव्यवहाराचा एक अविभाज्य भाग आहे, ह्या दोन परस्परविरोधी संकल्पनाव्युहांचा विचार पाटणकरांनी केला असून त्यांना अनुक्रमे अलौकिकतावाद आणि लौकिकतावाद अशी नावे दिलेली आहेत. दोन ध्रुवांसारखे असणारे हे संकल्पनाव्यूह परस्परविरोधी असले तरी परस्परपूरकही आहेत आणि बहुतेक कलांमध्ये ते निदान बीजरूपाने उपस्थित असलेले दिसतात. असे पाटणकरांचे प्रतिपादन आहे.कलाव्यवहाराची ही चर्चा त्यांनी आपल्या श्सौंदर्यमीमांसाश (१९७४) या ग्रंथात केली आहे.

सौंदर्य आणि कलास्वरुप याविषयी शरदचंद्र मुक्तिबोध यांचे विचार महत्त्वाचे आहेत.त्यांच्या मते मानुषता हे तत्त्व ललितकृतीचे व्यवच्छेदक लक्षण वेगळे व श्रेष्ठकनिष्ठतेचा निकष वेगळा ही आपत्ती येऊ देत नाही. वाङ्मयीन ललित कृतीचे या दृष्टिकोनाच्या आधाराने मूल्यमापन करता येऊ शकते. त्यांनी हे मत 'सृष्टी सौंदर्य' आणि 'साहित्य' या ग्रंथात मांडले आहे.

ह्या कालखंडाच्या आरंभी लघुमासिकांचा प्रवाह मराठीत अवतरला होता. त्या प्रवाहाचे एक अध्वर्यू अशोक शहाणे ह्यांच्या श्मराठी साहित्यावरील हा किरणश हा लेख, तसेच दिलीप चित्रे ह्यांची 'आधुनिक कवितेला सात छेद' ही लेखमाला हे नव्या दृष्टिकोनाचे केलेले टीकालेखन आहे.

ह्या कालखंडात ग्रामीण-दलित अस्मिता जागृत झाली. ग्रामीण साहित्याची भूमिका ज्यांनी खंबीरपणे मांडली, त्यात आनंद यादव आणि गो.मा.पवार ह्यांची नावे विशेष उल्लेखनीय आहेत. तसेच दलित साहित्य समीक्षेच्या संदर्भात म.ना.वानखेडे, म.भि.चिटणीस, बाबूराव बागूल, गंगाधर पानतावणे इत्यादींचे समीक्षात्मक लेखन महत्त्वपूर्ण ठरले. आदिवासी साहित्याच्या संदर्भात विनायम तुमराम यांनी लेखन केलेले आहे.

साठोत्तरी काळातली समीक्षा केवळ अर्वाचीन साहित्याचा विचार करत होती असे नाही, तर ती प्राचीन साहित्याचा आणि साहित्यशास्त्राचाही विचार करीत होती. ग.त्र्यं.देशपांडे, र.पं.कंगले ह्यांसारख्या अभ्यासकांनी हा विचार केलेला आहे. त्याचप्रमाणे गंगाधर गाडगीळांनी संस्कृत साहित्यातील रसचर्चेला अडगळ मानल्यावर ती रसचर्चा अडगळ कशी नाही, गाडगीळांच्या विवेचनातल्या त्रुटी कोणत्या आहेत, याचे साधार विवेचन तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी आपल्या 'आधुनिक मराठी साहित्याची समीक्षा व रससिद्धांत' (१९७२) या ग्रंथात केलेले आहे. प्राचीन संस्कृत साहित्यातील रसविचार, व्यूहकल्पना इत्यादींचा सखोल विचार गं.बा.सरदार, दि.के.बेडेकर,नरहर कुरुंदकर यांनी केला. प्राचीन साहित्याकडे एका वेगळ्या दृष्टीने रा.चि.ढेरे, गो.म.कुलकर्णी, म.रा.जोशी, म.वा.धोंड, रा.ग.जाधव, व.दि.कुलकर्णी, ल.स.जोग, द.भि.कुलकर्णी इत्यादींनी पाहिले. या समीक्षकांच्या लेखनाने प्राचीन साहित्याचे नवे अनुबंध रसिकांसमोर आले.

मर्ढेकरयुगात आणि १९६० नंतरही कवितेचा विचार आधिक्याने झालेला दिसून येतो. काव्याचे आढावे, कवींचा स्वतंत्रपणे अभ्यास, मार्क्सवादी, रूपवादी दृष्टींनी झालेली काव्य समीक्षा, कवितांची उपयोजित समीक्षा असे तिचे स्वरूप आहे.रसग्रहण-कला आणि स्वरूप (गो.म.कुलकर्णी २ री आ. १९७३)कविता फुलते कशी?(संपा.वा.रा.ढवळे, व.दि.कुलकर्णी, १९७५) दीपस्तंभ (ल.ग.जोग १९७१) इत्यादींचा या दृष्टीने उल्लेख करावयास हवा.

इतर वाङ्मय प्रकारात काही कथा व कथाकार ह्यांच्या संदर्भात विश्लेषणपर असे लेखन झाले आहे. 'मरण आणि वेलबुट्टी' (म.द.हातकणंगलेकर), 'निळे पाणी' (रा.ग.जाधव, १९८२) हे दोन ग्रंथ या संदर्भात उल्लेखनीय आहेत. भालचंद्र नेमाडे ह्यांनी कादंबरीवर प्रदीर्घ लेख लिहून त्या वाङ्मयप्रकाराची सांगोपांग मार्मिक चर्चा केली आहे. नरहर कुरुंदकरांचा 'धार आणि काठ' (१९७१) हा ग्रंथही मराठी कादंबरीच्या संदर्भात उल्लेखनीय आहे. याशिवाय,उषा हस्तक,चंद्रकांत बांदिवडेकर,हरिश्चंद्र थोरात यांनीही कादंबरीसंदर्भात उल्लेखनीय लेखन केलेले आहे.



Govt. College of Arts & Science Aurangabad
PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

भालचंद्र नेमाडे यांनी आपल्या 'टीकास्वयंवर' या ग्रंथात देशीवादाची संकल्पना मांडली या संकल्पनेच्या बाजूने आणि विरोधी असे दोही प्रकारचे लेखन अलिकडच्या काळात झालेले दिसून येते यासंदर्भात रंगनाथ पठारे, राजन गवस इत्यादींचा उल्लेख करावा लागेल.

आधारभूत पाश्चात्य समीक्षाग्रंथांची काही भाषांतरे या कालखंडात झाली.ॲरिस्टॉटलचे काव्यशास्त्र(गो.वि.करंदीकर, आ. २ री, १९७८), क्रोचेचे सौंदर्यशास्त्र एक भाष्य (१९७४) व कांटची सौंदर्यमीमांसा (१९७७, रा.भा. पाटणकरक), साहित्यसिद्धांत (स.ग.मालशे) (रेने वेलेक आणि ऑस्टिन वॉरनालिखित) थिअरी ऑफ लिटरेचरचे भाषांतरही उपलब्ध झाले आहे १९८२).

ही नवी समीक्षा कलेचा, तिच्या सारतत्त्वाच्या, अंतिम उद्देशांचा, निर्मितीप्रक्रियेचा अधिक सजगपणे विचार करते आहे. वामन मल्हार जोशी, वि.स.खांडेकर इ.समीक्षकांपुढे टॉलस्टॉय, कोलरिज, वर्डस्वर्थ, मॅथ्यू आर्नोल्ड इ. आदर्श होते. आजच्या समीक्षकांपुढे टी.एस.एलियट, सार्त्र, काम्यू हे आदर्श आहेत. जीवशास्त्रीय, मानसशास्त्रीय, समाजशास्त्रीय, तात्त्विक, सौंदर्यशास्त्रीय, भाषा वैज्ञानिक अशा विविध दृष्टिकोनामुळे ही समीक्षा कलाविषयक जाणिवा विकसित करणारी ठरली आहे.

– जनार्दन काटकर

Govt. College of Arts & Science Aurangabad.

PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

पद्मगंधा प्रतिष्ठान
राज्यस्तरीय मराठी
साहित्य संमेलन